# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.07.2025** **वार- शनिवार**

---

**नाशिक अधिकारीभेट**

पिंपरी चिंचवड महापालिकेनं शहरातील नागरी समस्या कमी करण्यासाठी केलेल्या उपाय योजना आणि विकास कामाचं प्रारूप जाणून घेण्यासाठी नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळाने नुकतीच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला भेट दिली. यावेळी शहरातील स्थापत्य, हरित सेतू, ग्रीन बॉण्ड, इंटग्रेटेड कमांड कंट्रोल सेंटर, पुराच्या पाण्याचे नियोजन, मलनिस्सारण, स्वच्छ भारत मोहीमे अंतर्गत होत असलेली कामं अशा विविध प्रकल्पांची माहिती संगणकीय सादरीकरणाद्वारे नाशिक महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. या अधिकाऱ्यांनी शहरातील विकास कामांची पाहणी देखील केली.

**रिंगरोड**

पुणे महानगर क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या रिंग रोडसाठीची दहा गावांतील भूसंपादनासाठीची संयुक्त मोजणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यानुसार भूसंपादनासाठी थेट वाटाघाटीची प्रक्रिया प्रशासनानं हाती घेतली आहे. उर्वरित तीन गावांची संयुक्त मोजणी अद्याप प्रलंबित आहे.

**पुणे मनपा**

पुणे शहराच्या विविध भागांतील सात नाट्यगृह आणि सांस्कृतिक केंद्रांच्या स्वच्छतेसाठी १ कोटी २२ लाख रुपयांच्या निविदेला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने मंजुरी दिली आहे. राज्याची सांस्कृतिक राजधानी असा नावलौकिक असलेल्या पुण्यात अनेक नाट्यगृह आणि कलामंदिरं आहेत. मात्र, अनेक नाट्यगृहांमध्ये अपुऱ्या सोयीसुविधा आणि स्वच्छतेचा अभाव असल्याच्या तक्रारी महापालिकेकडे येतात. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

PMPML

परिसर या सामाजिक संस्थेनं पुणे महानगर परिवहन महामंडळाची विश्वासार्हता, सोयीसुविधा, आरामदायी प्रवास आणि परवडणारं भाडं यांसह विविध १२ निकषांवर आधारित अभ्यास केला आहे. त्यातून या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील विस्कळीतपणा, वेळापत्रकातील त्रुटी, थांब्यांवरील असुविधा अशी विविध त्रुटी समोर आल्या; त्यामुळे पीएमपीएमएलची सेवा ब दर्जाची असल्याचं 'परिसर' संस्थेच्या अहवलातून स्पष्ट झालं आहे. यासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उपनगरातील ४१ बस थांबे आणि ९ आगारांमध्ये जाऊन निरीक्षण करण्यात आलं. तसंच एक हजार नागरिकांचे अभिप्राय घेऊन हा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला, अशी माहिती परिसर संस्थेचे संचालक रणजित गाडगीळ यांनी दिली.

**बीआरटीएस**

दरम्यान पिंपरी चिंचवडमध्ये बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टम अर्थात बीआरटीएस ही उच्च क्षमतेची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणून समोर येत आहे. या अंतर्गत शहरातील पाच मुख्य विभागात दररोज ७ हजार ३८९ बसफेऱ्या सुरू आहेत; त्यातून सुमारे ३ लाख ६० हजार प्रवासी प्रवास करीत असल्याचं आयटीडीपी इंडिया संस्थेच्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. पीएमपीएमएलला अजून सुमारे २ हजार ७०० बसेसची कमतरता भासत आहे. त्यासाठी पुणे, पिंपरी चिंचवड महापालिका लवकरच बसेस देणार आहेत.

**देगलूरकर**

मूर्तिशास्त्रानं सर्वसामान्यांचे चर्मचक्षू आणि भावचक्षू, यांचा सूक्ष्म विचार केला आहे; आणि श्री विठ्ठलाची मूर्ती याच विचारांची परिणती आहे; ही विठ्ठलमूर्ती सामाजिक अभिसरण आणि प्रबोधनाचा संदेश देणारी आहे, असं प्रतिपादन ज्येष्ठ मूर्तिशास्त्रतज्ज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी काल पुण्यात केलं. इंडी हेरीटेजतर्फे सुरू करण्यात आलेल्या मास्टर क्लास उपक्रमाचा प्रारंभ डॉ. देगलूरकर यांच्या विठ्ठल मूर्ती या विषयावरील व्याख्यानाच्या माध्यमातून झाला. भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या फिरोदिया सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला श्रोत्यांचा उस्त्फुर्त प्रतिसाद लाभला.

**रेल्वे**

पुणे रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी पुणे रेल्वे स्थानकावर 160 नवीन अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरू आहे. पुणे रेल्वे स्थानकावर यापूर्वी 75 सीसीटीव्ही कॅमेरे होते. मात्र, ते जुने झाल्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी झाली होती. त्यांच्या जागी आता अत्याधुनिक 160 नवे कॅमेरे बसविले जात आहेत. स्थानकावरील कॅमेऱ्यांची संख्या दुप्पट होणार असून, प्रत्येक कोपऱ्यावर बारक नजर ठेवणं शक्य होणार आहे.

**सौरकृषीपंप**

राज्यात विविध योजनांमध्ये ५ लाख ६५ हजार सौर कृषी पंप बसविण्यात आले आहेत. हे सौर पंप बसविल्यानंतर त्यातील बिघाडाबाबतच्या तक्रारी मोबाइल ॲपवरून नोंदविण्याची सुविधा देखील महावितरणने शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे.

**पवनाधरण**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे पवना धरणातील पाणीसाठा वाढला असून धरण 72 टक्के भरलं आहे. त्यामुळे आज दुपारपासून धरणातून पाण्याचा मोठ्या प्रमाणावर विसर्ग करण्यात येत आहे. हा विसर्ग येत्या 15  जुलैपर्यंत सुरू राहणार असण्याची शक्यता आहे; त्यामुळे पवना नदी काठच्या नागरीकांनी सतर्क राहावं असं आवाहन पूरनियंत्रण कक्षाच्या वतीने करण्यात आलं आहे.

**खडकवासला**

खडकवासला धरणातील पाणी साठाही वाढला असून गेल्या 16 दिवसात धरणातून पावणे चार टीएमसी पाण्याचा विसर्ग करण्यात आला आहे. खडकवासला प्रकल्पातील चार धरणात मिळून सध्या 60 टक्के म्हणजे 17 पूर्णांक 37 टीएमसी इतका पाणीसाठा झाला आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ हवामान होतं, कमाल तापमान 27 तर किमान तापमान 22 पूर्णांक 7 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही शहर परिसरात ढगाळ हवामानासह हलक्या पावसाचा तर घाट परिसरात मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटु विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**